PWDVA 18.2025 Exh. 01
Order
Issue notice to respondents through Protection Officer.

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2025.07.03 16:13:45 +0530

JMFC, Ghodegaon

# घोडेगाव येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकरी सो,

यांचे न्यायालयात

फौ.की.अर्ज- /२०२५.

**सौ.अश्विनी रवि ताते.**
वय-२७ वर्ष,धंदा-काहीही नाही.
रा.द्वारा- श्री धोंडू तुळशीराम धराडे.
मु/पो-कुशिरे खुर्द,ता-आंबेगाव,जिल्हा-पुणे.
मो-७६६६६७८३६९९ .

} **अर्जदार**

**विरुध्द**

१) **श्री.रवि संजय ताते.**
वय-२९ वर्ष,धंदा-शेती.

२) **श्रीमती.चिंगुबाई संजय ताते.**
वय-६३ वर्ष,धंदा-शेती.

३) **श्री.समीर संजय ताते.**
वय-२४ वर्ष,धंदा-शेती.

४) **श्री. सुनील धोंडू ताते.**
वय-४५ वर्ष,धंदा-शेती.

५) **सौ.रंजना किसन गवारी.**
वय-४७,धंदा –शेती.

जाबदेणार नं.१ ते ५ रा-मु/पो- माळेगाव खुर्द,
ता-मावळ,जिल्हा -पुणे.

} **जाबदेणार**

**अर्ज-कौटूबिक हिंसाचारापासून महिलां - चे संरक्षण अधिनियम व नियम २००५ चे अंतर्गत कलम १२, १४, १८, १९, २०, २२ व २३ अन्वये आदेश होणे व मिळणे - कामी अर्ज.**

**याकामी अर्जदार मे.कोर्टास नम्रपणे कळवितात ते खालीलप्रमाणे**.-

१) अर्जदार हि या मे.कोर्टाचे स्थळसिमेत गावमौजे कुशिरे खुर्द ,ता-आंबेगाव, जि-पुणे येथे रहात आहे. म्हणून सदरचा अर्ज दाखल करून घेवून तो चालविण्याचा व त्यावर अंतिम निकाल करण्याचा या मे.कोर्टास पूर्ण अधिकार आहे.

२) जाबदेणार नं.१ हा अर्जदार हिचा पती असून जाबदेणार नं.२ ही अर्जदार हिची सासू आहे. जाबदेणार नं.३ हा अर्जदार यांचा दीर आहे. जाबदेणार न.४ हे अर्जदार हिचे चुलत सासरे आहे.तसेच जाबदेणार न.५ हि जाबदेणार न.१ यांची नात्याने आत्या (वडिलांची बहिण) आहे.

३) सदरचा अर्जातील हिंसाग्रस्त व्यक्ती म्हणून अर्जदार हिने कौटूबिक हिंसेपासून स्रीयांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२,१४,१८.१९,२०,२२ व २३ प्रमाणे दाखल केलेला आहे.सदर कौटूबिक घटनेची तक्रार/कौटूबिक घटना अहवाल यांची दखल घेण्याबाबत विनंती करण्यात येते कि,या अर्जाचे संदर्भात योग्य असेल ते सर्व अथवा इतर कोणताही आदेश मे.कोर्टाने पारित करावा .

**सदर अर्जाची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे**-

४) अर्जदार व जाबदेणार न.१ यांचा विवाह हा समाज जन-रितीरिवाजाप्रमाणे दिनाक -१८/०५/२०१९ रोजी मु/पो-कुशिरे खुर्द,ता-आंबेगाव,जिल्हा-पुणे येथे पार पडलेला होता व आहे.सदरचा विवाह हा एकमेकाच्या पसंतीने झालेला होता व आहे. लग्नानंतर जाबदेणार नं.१ यांनी अर्जदार हिस माळेगाव खुर्द, ता-मावळ, जिल्हा-पुणे येथे नांदण्यांस घेऊन गेलेले होते व आहेत.सदरहू वेळी जाबदेणार नं.१ यांचे घरी

जाबदेणार नं.१ स्वतः, जाबदेणार नं.२ ते ४, सासरा व नणंद अनुक्रमे नामे सारिका व पूजा वगैरे असे सर्वजण एकत्रित राहू लागलात.सासरी नांदत असताना जाबदेणार नं.१ ते ५ यांनी अर्जदार हिस लग्नानंतर सुरवातीचे एक वर्षच व्यवस्थित नांदविले. परंतु एक वर्षानंतर जाबदेणार नं.१ हा अर्जदार हिचेबरोबर वारंवार कोणत्या ना कोणत्या कारणावरून भांडणतंटा करत असे.सदरचा विवाह झाल्यापासून जाबदेणार न.१ ते ५ यांनी अर्जदार हिस केव्हाही माहेरी सणावाराला पाठविले नव्हते व नाही. अर्जदार हिचे आईने जाबदेणार नं.१ ते ५ यांस , " तुम्ही माझ्या मुलीला सणावाराला माहेरी का पाठवत नाही. "अशी विचारणा केली असता, जाबदेणार नं.१ ते ५ यांनी अर्जदार यांच्या आईस अपशब्द वापरून तिचा अपमान केलेला होता व आहे.तसेच जाबदेणार न.१ ते ५ हे अर्जदार हिला मानसिक व शाररीक त्रास देवून तिचा छळ करत असे.अर्जदार हिने संसार-प्रपंच होण्याच्या दृष्टीने होणारा सर्व त्रास व छळ सहन केला.परंतु जाबदेणार नं.१ ते ५ यांच्या वागनेत काडीमात्र फरक अथवा बदल झालेला नव्हता व नाही. तसेच जाबदेणार नं.१ हा घरात किराणा न भरणे, अर्जदार हिस कपडेलत्ते न पुरवणे, अर्जदार हिची पत्नी ह्या नात्याने कोणतीही काळजी न घेणे यासारखे गैरकृत्य करत असे.तसेच जाबदेणार न.१याने अर्जदार हिस कोणत्याही प्रकारचे संसारिक व प्रापंचिक सुख दिलेले नव्हते व नाही.

५) तसेच लग्न झालेनंतर दोन महिन्यांनी जाबदेणार नं.१याने अर्जदार यांच्या - बरोबर छोट्या– छोट्या कारणावरून भांडणतंटा करून मारहाण करण्यास सुरुवात केली. जाबदेणार नं.१ ते ५ हे अर्जदार हिच्याकडून अंगमेहनतीची कामे करून घेत असत.अर्जदार ही जर आजारी पडली तर जाबदेणार नं.१ हा तिला औषधोपचार करण्याकरिता दवाखाण्यात घेवून जात नसे.तसेच जाबदेणार नं.२ ह्या अर्जदार व जाबदेणार नं.१ यांच्यामध्ये गैरसमज निर्माण करून भांडणे लावून देण्याचे काम

करत असे.तसेच जाबदेणार न २ ह्या जाबदेणार नं.१ यांस ," तुझ्या सासऱ्याकडून काय भेटलं,गेल्यावर कधी चहा पण विचारात नाही, लग्नात काहीही दिले नाही, भिकारी आहेत तुझ्या सासर-वाडीचे लोक असे म्हणून वारंवार हिणवत असे." सदरील जाबदेणार नं.२ चे हे बोलणे ऐकून जाबदेणार नं.१ हा अर्जदार हिस वारंवार मारहाण करत असे.

६) अर्जदार हिस जाबदेणार नं.१ पासून दिवस गेलेले असताना म्हणजेच गरोदरपणात जाबदेणार नं.१ ते ५ यांनी अर्जदार हिची कोणतीही काळजी घेतलेली नव्हती व नाही. तसेच जाबदेणार नं.२ ते ४ हे अर्जदार हिस गरोदरपणातच कष्टाची कामे करायला लावत असत.सदरच्या अंगमेहनतीच्या कामामुळे अर्जदार हिस गरोदरपणात खूप मानसिक व शाररीक व्याधिना सामोरे जावे लागलेले होते व आहे. तसेच सदर जाबदेणार न.१ याने अर्जदार हिस केव्हाही उपचारासाठी डॉक्टरकडे दवाखान्यात घेवून गेलेले नव्हते व नाही. तसेच अर्जदार हिचे गरोधरपणात केव्हाही वेळेत औषधोपचार केलेला नव्हता व नाही.जाबदेणार न.१ ते ४ यांनी गरोधरपणात अर्जदार हिची कोणतीही काळजी न घेतल्यामुळे त्याचा परिणाम अर्जदार हिचे शाररीक व मानसिक स्वास्थ्यावर झालेला होता व आहे.तसेच अर्जदार हिची प्रस्तुती हि अर्जदार हिचे आई-वडिलांनी त्यांच्या घरी म्हणजेच गावमौजे कुशिरे खुर्द, ता-आंबेगाव,जिल्हा–पुणे येथे केलेली होती व आहे.तसेच सदर जाबदेणार न.२ याने त्यांची मुलगी आर्वी यांस त्यांचेकडे म्हणजेच गावमौजे माळेगाव खुर्द, ता-मावळ, जिल्हा-पुणे येथे घेवून गेलेले होते व आहे.परंतु जाबदेणार न.१ते ४ यांनी अर्जदार हिचे गरोधरपणात कोणतीही काळजी न घेतल्यामुळे तसेच कोणतेही वैद्यकीय उपचार वेळेत न घेतल्यामुळे अर्जदार हिची मुलगी आर्वी हिचा जन्म झाल्यानतर २ महिन्यानंतर ती मयत झालेली होती व आहे.

७) जाबदेणार नं.१ हा अर्जदार हिस शाररीक व मानशिक त्रास देवून तिचा छळ करत असे. अर्जदार हिने सदरची गोष्ठ तिचे माहेरी आईला सांगितली असता आईने अर्जदार हिस समजावून सांगून नांदण्यास सांगितलले होते व आहे.

८) अर्जदार ही सासरी नांदत असताना जाबदेणार नं.१ याने कधीही पती या नात्याने कोणतीच जबाबदारी पार पडलेली नव्हती व नाही.अर्जदार हिस अंग झाकण्या - करिता पुरेसा कपडेलत्ता देखील देत नसत, अर्जदार हि तिच्या आईकडून जुन्या साड्या आणून त्याच अंगावर घालत असे परंतु जाबदेणार नं १ ते ५ यांना अर्जदार हिची कोणतीही दया आलेली नव्हती व नाही.

९) अर्जदार ही सासरी नांदत असताना जाबदेणार न.१ याने अर्जदार हिची देखभाल ,काळजी घेतलेली नसून त्यांना दिवस-दिवस उपाशी ठेवून अर्जदार हिचा शाररीक व मानशिक छळ करून तिला संसारिक-प्रापंचिक सुखापासून वंचित ठेवलेले होते व आहे.

१०) तसेच अर्जदार ही जाबदेणार न.१ यांचेपासून पुन्हा म्हणजेच दुसऱ्यांदा गरोधर असताना जाबदेणार न.१ व त्याचे घरातील लोकांनी अर्जदार हिची कोणतीही काळजी घेतलेली नव्हती व नाही.तसेच वेळेत औषधोपचार केलेला नव्हता व नाही. अर्जदार हिची प्रसूती ही अर्जदार हिचे सासरी झालेली होती व आहे.सदर प्रसूतीचा झालेला खर्च हा अर्जदार हिचे आई - वडिलांनी कर्ज काढून केलेला होता व आहे.सन २०२३ मध्ये अर्जदार हिस गरोधरपणामध्ये जाबदेणार न.१ ते ५ यांनी खूप त्रास दिलेला होता व आहे.अर्जदार हिची प्रसूती झाली प्रसूतीमध्ये अर्जदार हिचे खूप हाल झालेले होते.त्यामुळे डॉक्टरांनी अर्जदार हिस आय.सी.यु मध्ये ठेवण्यास सांगितलेले होते व आहे.सदर काळात जाबदेणार न.१ ते ५ यांनी अर्जदार हिची कोणतीही चौकशी केलेली नव्हती व नाही.तसेच अर्जदार हि दवाखान्यात औषधोपचार घेत असल्यामुळे तिला तिच्या मुलापासून वेगेळे ठेवलेले होते व आहे.तसेच जाबदेणार

न.१ ते ५ यांनी सदर मुलाला अर्जदार हिचेपासून वेगळे ठेवल्यामुळे व मुलाला आईचे अंगावरचे दूध न मिळालेमुळे सदर मुलगा जास्त आजारी पडलेला होता व आहे. सदर वेळेस डॉक्टरांनी जाबदेणार न.१ ते ५ यांना , "तुम्ही मुलाला आईजवळ ठेवा." असे सांगितले असता जाबदेणार न.१ ते ५ यांनी डॉक्टर यांचे काहीही एक न एकता सदर मुलाला त्यांचेबरोबर गावमौजे माळेगाव खुर्द,ता –मावळ,जिल्हा –पुणे येथे घेवून गेलेले होते व आहे.जाबदेणार न.१ ते ५ यांनी अर्जदार यांचे मुलाला घेवून गेल्यानंतर सदर ठिकाणी त्याची कोणतीही काळजी न घेतल्यामुळे मुलगा मयत झालेला होता व आहे. सदर गोष्ठ हि जाबदेणार न.१ ते ५ यांनी अर्जदार व तिचे माहेरकडील लोकांपासून लपवून ठेवलेली होती व आहे.सदर गोष्ठ अर्जदार हिस समजल्यानंतर अर्जदार हिस खूप मोठा शाररीक व मानशिक धक्का बसलेला होता व आहे. अर्जदार हि सदरील मानशिक धक्का न पचवू शकल्यामुळे त्यांचा परिणाम अर्जदार हिचे मेंदूवर झालेला होता व आहे.तद्नंतर डॉक्टरानी अर्जदार हिचे मेंदूचे तातडीने ऑपरेशन करावयास सांगितलेले होते.परंतु जाबदेणार न.१ ते ५ यांनी सदर अर्जदार हिची व तिचे आजाराची व डॉक्टरांनी करावयास सांगितलेले मेंदूचे ऑपरेशनची कोणतीही जबाबदारी घेतलेली नव्हती व नाही. सदर जाबदेणार न.१ ते ५ हे अर्जदार हिस हॉस्पिटलला गेलेले होते व आहे. त्यानंतर अर्जदार हिचे माहेरकडील लोकांनी त्यांची आर्थिक परिस्थिती नसताना लोकांकडून हातउसने पैसे घेवून ,कर्ज काढून अर्जदार हिच्या डोक्याची एका बाजूची कवटी काढून मेंदूचे ऑपरेशन केलेले होते व आहे. तेव्हापासून सदर जाबदेणार न.१ ते ५ यांनी अर्जदार हिची कोणतीही चौकशी अथवा विचारपूस केलेली नव्हती व नाही.तसेच अर्जदार हिची कोणतीही जबाबदारी घेतलेली नव्हती व नाही.तसेच अर्जदार हिस सदर ऑपरेशन करण्यास रक्कम रुपये-५,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पाच लाख रुपये) इतका खर्च आलेला होता व आहे. तसेच आजमितीसही प्रत्येक महिन्याला औषधोपचार चालू असून प्रत्येक

महिन्याला खूप मोठा खर्च येत असून सदर खर्च करण्याची अर्जदार हिची परीस्थीती नाही.अर्जदार हि तिचे माहेरी दुख:मय जीवन कंठत आहे.

११) अर्जदार हिस जाबदेणार न.,१ याने नांदविण्यास घेवून जाण्याबाबत अनेकदा नातेवाईक,मध्यस्थी यांचेमार्फत बैठकी झाल्या.परंतु जाबदेणार नं.१ यांनी सदरील बैठकीत देखील शिव्यागाळ करून अर्जदार हिस मारहाण केली व आजही अर्जदार यांस फोन करून फोनद्वारे शिव्यागाळ करून अपशब्द वापरत आहे.जाबदेणार नं.१ याने अर्जदार हिची साधी विचारपूस अथवा चौकशी देखील केलेली नव्हती व नाही. अर्जदार यांनी नातेवाईक व मध्यस्थी मार्फत नादविण्यास नेण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु जाबदेणार नं १ ते ५ यांनी अर्जदार हिस नादविण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिलेला होता व आहे.तेव्हापासून अर्जदार हि माहेरी अतिशय दुख:मय जीवन कंठत आहे.

१२) जाबदेणार नं.१ ने अर्जदार हिची कोणतीही चौकशी न करता स्वेछेने त्याग केलेला आहे.तिचा मानसिक व शारीरीक छळ केलेला आहे.अर्जदार हिस जगणे असह्य झालेले असून अर्जदार हिस आज रोजी उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. अर्जदार हि स्व:ताचा संभाळ व पालनपोषण करणेस असमर्थ आहे.अर्जदार हिने सदर अर्जामध्ये कलम २० नुसार, नुसकानी बद्दलची रक्कम व पोटगीची रक्कम मागितलेली आहे व ती देण्याची जाबदेणार याची ऐपत आहे.कारण जाबदेणार यांची गावमौजे माळेगाव खुर्द, ता-मावळ,जिल्हा-पुणे येथे ५ एकर शेतजमीन आहे. त्यामध्ये जाबदेणार नं.१ ते ४ हे जिरायती व बागायती पिके घेत आलेले होते व आहेत. सदर शेतीच्या उत्पन्नातून जाबदेणार न.१ हा दरसाल पाच लाखाचे पुढे उत्पन्न घेत आहे.तसेच जाबदेणार नं. १ यांचेकडे २ बैल व ३ दुभती गाई असून सदर दुधाचे उत्पन्नापासून जाबदेणार न.१ यांस प्रतिमहा रक्कम रुपये-५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार रुपये) इतके उत्पन्न मिळते.तसेच जाबदेणार न.१

हा एका नामांकित कंपनीमध्ये कामाला असून सदर नोकरीतून त्यांस प्रतिमहा रक्कम रुपये-१५,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार रुपये फक्त)इतके उत्पन्न मिळते. जाबदेणार नं.१ ते ५ हे शरीराने धडधाकट असून शेती व्यवसाय करून शेतातून सालोसाल उत्पन्न घेत आलेले होते व आहेत.वर नमूद केल्याप्रमाणे जाबदेणार याची आर्थिक परिस्थिती अतिशय सधन आहे.त्यामुळे अर्जदाराच्या मागणीप्रमाणे नुसकान भरपाईची व पोटगी देण्याची जाबदेणाराची ऐपत आहे. जाबदेणार नं.१चे घरातील सर्व लोक कामविते असून जाबदेणार नं.१.वर कुणीही अवलंबून नाही.त्याची महिना १०,०००/-देण्याची ऐपत आहे.

१३) वर नमूद केल्याप्रमाणे जाबदेणार यांनी अर्जदार यांचेवर खूपच घरगुती जुलूम केलेला आहे.व आजही त्यास पश्याताप होत नाही.त्यामुळे अर्जदाराच्या भविष्यातील आधारासाठी म्हणून अर्जदार हिने कलम २२ नुसार मानसिक,त्रास,भावनिक दु:ख या बद्दल नुकसान भरपाई देखील जाबदेणार यासकडून मागितलेली आहे.

१४) अर्जदार हिला जाबदेणार याने नेसत्या वस्त्रानिशी अंगावरील सर्व दागिने काढून घेवून घरातून हाकलून दिले.अर्जदाराचे सर्व स्त्रीधन हे जाबदेणार याकडे आहे. अर्जदार पुढील भविष्यासाठी तिचे स्त्रीधनाची पुढीलप्रमाणे मागणी करत आहे.

**<u>अर्जदार हिचे अंगावर घातलेले दागिने.</u>**

१)मंगळसूत्र १ तोळे

२.जोडवी

३.पैंजण .

४.अंगठी.

**<u>संसार उपयोगी भेट वस्तू</u>**

१)स्टील मांडणी १

२)कपाट-१

३)बेड -१ नग.

४)पाट -२नग.

५)झाडू -१ नग.

६)टोपली -१ नग

७)हंडा - ४ नग.

८) कळशी १

९)ताट -६ नग

१०)डिश -६ नग

११)ताबे -६ नग

१२)ग्लास -६ नग.

१३)स्टील डबे - ६ नग

१४)मोठे डबे- २ नग

१५)बादली -२ नग.

१६)स्टील टोप-६ नग.

१७) बरण्या -६ नग.

१८)परात-२ नग

१९)पेले-६ नग.

२०)वाट्या -६ नग

२१)चमचे -६ नग.

२२)चमचा कलथा,भात उकरी प्रत्येकी -१ नग.

२३)किटली -१ नग.

२४)किसणी -१ नग.

२५)मसाला डब्बा-नग.

२६)कढई-१ नग.

२७)तवा -१ नग.

२८)विळी-१ नग.

२९)मिक्सर १ नग.

३०)पळपट-१ नग.

३१)कपबशी-१ नग.

३२)कन्यादानाची पाच भांडी – ताम्हण,गडू,ताट,समई,ताब्या,कृष्ण

३३ )तोरण-१

वरील सर्व वस्तूची अंदाजे किमत रुपये-१,००,०००/-व लग्नाचा खर्च व जाबदेनाराकडील पाहुण्याचा मानपानाचा खर्च रुपये-२,००,०००/-व बाकी खर्च १,००,०००/-असा एकूण खर्च रुपये ४,००,०००/-( अक्षरी रक्कम रुपये चार लाख रुपये फक्त).

१५) **अर्जास कारण** – दिनांक-१९/०५/२०१९ पासून ते जून २०२५ पर्यंत जाबदेणार यांनी अर्जदार हिचा अतोनात असा कौटुबिक छळ केला व तिला नेसत्या वस्त्रानिशी हाकलून देवून नांदविण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला.त्यावेळी प्रथम घडले व आजही घडत आहे.

१६) अर्जदार हिने या आधी या मे.कोर्टात अथवा अन्य कोणत्याही कोर्टात या प्रकारचा अर्ज दाखल केलेला नाही.

१७) **अर्जदार हिची मे.न्यायालयास विनंती कि,**

अ) लग्न सोहळ्याचा खर्च रुपये ४,००,०००/-(अक्षरी चार लाख रुपये फक्त)जाबदेणार यासकडून अर्जदार हिस मिळावा.

**ब**) जाबदेणार याने वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार हिच्यावर कोणतेही वाजगी व सयुक्तिक कारण नसताना अतोनात घरगुती जुलूम करून तिला मानसिक व शारीरिक त्रास दिला.त्यामुळे तिला भावनिक दु:ख झाले त्याबद्दल नुसकान भरपाई म्हणून रुपये-२,००,०००/-(अक्षरी दोन लाख रुपये फक्त) जाबदेणार यासकडून अर्जदारास मिळण्याचा हुकुम व्हावा.

**क**) अर्जदार हिचे स्त्रीधन अथवा त्याची बाजारभावाप्रमाणे होणारी रक्कम रुपये १,५०,०००/-(अक्षरी एक लाख पन्नास हजार रुपये फक्त) जाबदेणार यासकडून अर्जदारास मिळण्याचा हुकुम व्हावा.

ड) अर्जदार यांची जाबदेणार नं.१ ने राहण्याची सोय करावी अगर अर्जदार यांस दरमहा रक्कम रुपये-३,०००/-(अक्षरी रक्कम रुपये तीन हजार रुपये) प्रतिमहा घरभाडे म्हणून जाबदेणार नं.१ कडून मिळण्याचा हुकुम व्हावा.

इ) सदर अर्जाचा खर्च रक्कम रुपये ३०,०००/-(अक्षरी रक्कम रुपये तीस हजार ) जाबदेणार यांसकडून अर्जदार हिस मिळावा

ई) सदर अर्जाची बजावनी जाबदेणारांवर सुरक्षा अधिकारी मार्फत करण्यात यावी. सदर प्रकरणी सुरक्षा अधिकार्यांचा अहवाल मागविण्यात यावा.

फ) अर्ज दाखल केले पासून अर्जदार यांस जाबदेणार नं.१ कडून दरमहा रक्कम रुपये-१०,०००/-(अक्षरी रक्कम रुपये दहा हजार रुपये)अन्न,वस्त्र,पोटगी व इतर दैनंदिन गरजेकारिता पोटगीच्या स्वरुपात द्यावेत असा हुकुम करण्यात यावा.

ग) इतर योग्य व न्याय हुकुम अर्जदार यांचे लाभात करण्यात यावे.तसेच जरूर तर अर्ज दुरुस्तीची परवानगी असावी.

येणेप्रमाणे अर्ज असे.

घोडेगाव.

दिनाक-२४/०६/२०२५

अर्जदार

(**सौ.अश्विनी रवि ताते**)

अर्जदार तर्फे ॲड.

**(श्री.दिपक लोहोटे)**

# व्हेरिफिकेशन

मी. **सौ.अश्विनी रवि ताते**.वय-२७ वर्ष,धंदा-काहीही नाही.रा.द्वारा-श्री धोंडू तुळशीराम धराडे. मु/पो-कुशिरे खुर्द, ता-आंबेगाव,जिल्हा-पुणे.सत्य प्रतिज्ञेवर कथन करिते कि,

वर कलम १ ते १७ मधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याखाली मी माझी आज रोजी घोडेगाव मुक्कामी सही केली असे.

घोडेगाव.

दिनाक- 27/06/2024

अर्जदार तर्फे ॲड.

**(श्री.दिपक लोहोटे)**

Dharade

अर्जदार

**(सौ.अश्विनी रवि ताते)**